पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ४

**सभावृत्तांत**

दिनांक - **१६/०८/२०१८** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **१६/०८/२०१८** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२. मा.बाबर शर्मिला राजू - उपसभापती
३. मा.बुर्डे सुवर्णा विकास
४. मा.सोनवणे शारदा हिरेन
५. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
६. मा.तापकीर विनया प्रदीप (आबा)
७. बनसोडे राजू विश्वनाथ
८. मा.काळे उषा दिलीप
९. मा.अश्विनी गजानन-चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (शिक्षण विभाग), मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.लडकत – कार्य.अभियंता, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) पिं.चिं.मनपाच्या शाळांमध्ये मनशक्ती प्रयोग केंद्र, रेस्ट न्यु वे, लोणावळा यांचेकडून निःशुल्क ताणमुक्त अभ्यासाची माहिती/मार्गदर्शन करण्याची परवानगी देणेबाबत – मा.सुवर्णा बुर्डे , मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव

विषय क्र.२) शिक्षक दिन कार्यक्रमाच्या खर्चास मान्यता घेणेबाबत – मा.सुवर्णा बुर्डे, मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३) शिक्षण विभागाच्या प्राथमिक शाळांमध्ये मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अग्निरोधक यंत्रणा बसविणेबाबत – मा.सुवर्णा बुर्डे, मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) शिक्षण परिषद आयोजित करणेबाबत – मा.शर्मिला बाबर, मा.सुवर्णा बुर्डे यांचा प्रस्ताव

विषय क्र.५) महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांमध्ये १० वी.च्या विद्यार्थ्यांकरीता मोबाईल ॲपद्वारे अभ्यासक्रम उपलब्ध करुन देणेबाबत – मा.सुवर्णा बुर्डे, मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव

विषय क्र.६) शिक्षण विभागाच्या प्राथमिक शाळांमध्ये मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने वॉटर फिल्टर बसविणेबाबत – मा.सुवर्णा बुर्डे, मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव

विषय क्र.७) दापोडी येथील हुतात्मा भगतसिंग मनपा शाळेतील मुलींचे वर्ग सकाळी भरविणेबाबत त्याचप्रमाणे पिंपरी चिंचवड शहरामधील इतर शाळांमध्ये देखील मुलींचे वर्ग सकाळी भरविणेबाबत. – मा.राजू बनसोडे , मा.उषा काळे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) वीर भगतसिंग विद्यामंदिर दुरुस्ती करणेबाबत - मा.राजू बनसोडे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) दोपोडी येथील हुतात्मा भगतसिंग विद्यामंदिर येथे सातवी ते दहावी वर्ग वाढविणे बाबत - मा.विनया तापकीर , मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

विषय क्र.१०) प्रभाग क्र.३० महानगरपालिकेतील शाळांमध्ये शिक्षकांची संख्या वाढविणेबाबत – मा.विनया तापकीर , मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.११) पहिली ते सातवी सेमी इंग्रजी वर्ग सुरु करण्याबाबत – मा.विनया तापकीर, मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव

----------

दिनांक ०२/०८/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ०७ विषय क्रमांक – ०१

दिनांक - १६/०८/२०१८

सुचक : मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक : मा.शर्मिला बाबर

संदर्भ :- मा.सुवर्णा बुर्डे ,मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव –

महाराष्ट्र शासन यांचेकडील शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक शिप्रयो २२१८/प्र.क्र.५८/२०१८/प्रशिक्षण दिनांक २ ऑगस्ट २०१८ नुसार विद्यार्थ्यांचा ताणमुक्त अभ्यास व परिक्षेतील ताण कमी करण्यासाठी मेंदूशास्त्र, मानसशास्त्र ,इ.विविध शास्त्रांवर आधारित प्रयोग, अभ्यासाच्या सोप्या पध्दती परीक्षा काळातील धैर्य, स्मरणशक्ती वाढविणे , त्याच बरोबर सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न कसे करावेत. याचे मार्गदर्शन निःस्वार्थ युवा कार्यकर्ते डॉक्टर्स,इंजिनियर्स,शिक्षणतंत्र,विचारवंत यांच्या सहकार्याने मनशक्ती प्रयोग केंद्र, रेस्ट न्यू वे, लोणावळा यांचेकडून निःशुल्क करण्यात येत आहे. तरी या शासन निर्णयानुसार दिलेल्या अटींचे पालन करुन व शालेय अभ्यासक्रमावर कोणताही विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता

घेऊन मुख्याध्यापकांचे अधिपत्याखाली पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शाळांमध्ये सदर उपक्रम राबविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०८ विषय क्रमांक – ०२

दिनांक - १६/०८/२०१८

सुचक : मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक : मा.शारदा सोनवणे

संदर्भ :- मा.सुवर्णा बुर्डे ,मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात येत असतो या दिवशी गुणवंत शिक्षक/शिक्षिकांना पुरस्कार दिला जातो त्याच बरोबर आदर्श शाळा पुरस्कार देण्यात येत असतो तसेच उपस्थित शिक्षक वर्गाला चहापान, निमंत्रण पत्रिका इ.आणि पारितोषिक वितरण समारंभासाठी घेण्यात येणा-या हॉलचे भाडे इ.साठी खर्च येत असतो याकामी शिक्षक दिन या लेखाशिर्षाखाली र.रु.५,००,०००/-(अक्षरी र.रु.पाच लाख फक्त) तरतूद करण्यात आलेली आहे. यातुन सदर खर्च भागविण्यात येणार आहे. त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ०९ विषय क्रमांक – ०३

दिनांक - १६/०८/२०१८

सुचक : मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक : मा.शर्मिला बाबर

संदर्भ :- मा.सुवर्णा बुर्डे ,मा. शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागाच्या प्राथमिक शाळांमध्ये मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अग्निरोधक यंत्रणा बसविणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या शाळांमधील विविध ठिकाणी मुख्याध्यापक कार्यालय, प्रयोग शाळा, विद्युत मीटर बॉक्स, शाळा वर्ग या ठिकाणी असणारे विद्युत यंत्रणा, फर्निचर, शालेय बेंच तसेच इतर साधन सामग्रीस आग लागण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही. तरी या ठिकाणी सुरक्षिततेच्या कारणास्तव अग्निशमन यंत्रणा उभारणे अत्यंत महत्वाचे आहे. महानगरपालिकेच्या इतर कार्यालयांमध्ये देखील अग्निशामक यंत्रणा बसविणेत आली आहे. अग्निशामक विभागाकडील अधिका-यांनी मनपा शाळांची पाहणी करुन त्याप्रमाणे मनपाच्या प्राथमिक शाळांमध्ये देखील अग्निशामक विभागाकडील उपलब्ध तरतूदीमधून अग्निशमन यंत्रणा उभारणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १०　　　　　　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक – ०४

दिनांक - १६/०८/२०१८

सुचक : मा. शर्मिला बाबर　　　　　　　　　　　　　　　　　अनुमोदक : मा. सुवर्णा बुर्डे

संदर्भ :- मा. शर्मिला बाबर, मा.सुवर्णा बुर्डे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडील सर्व प्राथमिक शाळांचे मुख्याध्यापक/मुख्यध्यापिका आणि पिंपरी चिंचवड शहरातील खाजगी शाळांचे मुख्यध्यापक/ मुख्यध्यापिका यांची एकदिवसीय शिक्षण परिषद आयोजीत करणेचे निर्देश मा.प्रशासन अधिकारी यांनी दिले आहेत. या मध्ये सर्व मुख्यध्यापकांना विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये विकास करणेबाबत तसेच शाळांची गुणवत्ता वाढविणे इ.बाबतीत मार्गदर्शन केले जाणार आहे. मनपाचे विषयतज्ञ, मा.प्रशासन अधिकारी यांचे अधिपत्याखाली सदर कार्यशाळा होणार आहे. ही कार्यशाळा सकाळी १०.०० ते सायं.५.०० वाजेपर्यंत दिनांक – ०७/०९/२०१८ रोजी कै.अंकुशराव लांडगे नाटयगृह, भोसरी येथे आयोजीत करणेत येणार आहे. याकामी येणारा सर्व खर्च प्रशिक्षण शिबिरे/गट संमेलन या लेखाशिर्षातून खर्च करण्यात येईल या लेखाशिर्षावर र.रु.३,००,०००/- तरतूद करण्यात आलेली आहे. चहापान, नाटयगृह भाडे, इ. येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ११　　　　　　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक – ०५

दिनांक - १६/०८/२०१८

सुचक : मा. सुवर्णा बुर्डे　　　　　　　　　　　　　　　　　अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- मा.सुवर्णा बुर्डे, मा.शर्मिला बाबर, यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागाच्या १८ शाळा कार्यरत असून यामध्ये असणारे १० वी च्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमामध्ये बदल झालेला असून या विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रम समजणे अवघड जात आहे. सद्यपरिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांना डिजीटल ॲपद्वारे अभ्यासक्रम उपलब्ध करुन दिल्यास विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी लागणार आहे. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ होणे गरजेचे असून त्याअनुषंगाने ॲपद्वारे मुलांना चांगल्या प्रकारे टिप्स व टेक्निक, बदलेल्या प्रश्न पत्रिकेचे स्वरुप, व सरावासाठी प्रश्न पत्रिका उपलब्ध करुन देता येतील. तसेच ॲपद्वारे मार्गदर्शन करणेसाठी तज्ञ शिक्षकाचे मार्गदर्शन उपलब्ध करुन देता येईल त्यामुळे विद्यार्थ्यांना परिक्षेच्या आधी व परिक्षा कालावधीमध्ये येणारा ताण तणाव याचे समुपदेशन होऊन गुणवत्ता वाढ होईल. तरी १० वी च्या विद्यार्थ्यांना ॲपद्वारे अभ्यासक्रमाचे मार्गदर्शन करणेकामी माध्यमिक शिक्षण विभागाच २०१८-१९ चे लेखाशिर्ष गुणवत्ता वाढ व विकास यावर असलेल्या तरतूद मधून खर्च करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १२ विषय क्रमांक – ०६

दिनांक - १६/०८/२०१८

सुचक : मा. सुवर्णा बुर्डे अनुमोदक : मा. शारदा सोनवणे

संदर्भ :- मा.सुवर्णा बुर्डे, मा.शारदा सोनवणे, यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागाच्या माध्यमिक शाळांमध्ये मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने वॉटर फिल्टर बसविणे आवश्यक आहे. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पाण्याच्या टाकीमधून पाणी-पिणेसाठी सोय केलेली आहे. तरी यामध्ये पिण्याचे पाण्याची टाकी वेळेवर साफसफाई करणेत आली नसल्यास विद्यार्थ्यांना दुषित पाणी पिण्यामुळे आजारी पडण्याची शक्यता आहे. तसेच काही वेळा पिण्याचे पाण्याची पाईपलाईन फुटली असल्यास त्यामधून दुषीत पाणी टाकीमध्ये आल्यास टाकीमध्ये दूषीत पाणी होण्याची शक्यता आहे तरी मनपाच्या शाळांमध्ये पाण्याच्या टाकीमधून पाणी फिल्टर करुन दिल्यास विद्यार्थ्यांना चांगले व स्वच्छ पाणी पिण्यास देता येऊ शकते. तरी मनपा शाळांमध्ये वॉटर फिल्टर बसविणेकामी खर्च करणेस तरतूद उपलब्ध नसलेने इतर लेखाशिर्षावरून तरतूद उपलब्ध करुन पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १३ विषय क्रमांक - ०७

दिनांक - १६/०८/२०१८

सुचक : मा.राजू बनसोडे अनुमोदक : मा.उषा काळे

संदर्भ :- मा.राजू बनसोडे, मा.उषा काळे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका दापोडी येथील मनपाची हुतात्मा भगतसिंग मनपा शाळेतील मुलींचे वर्ग हे सकाळी भरविणेस मान्यता देणेत येत आहे. त्याचप्रमाणे पिंपरी चिंचवड शहरातील अन्य शाळांमध्ये देखील वरीलप्रमाणे आवश्यकता विचारात घेवून मुलींचे वर्ग हे सकाळी भरविणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १४ विषय क्रमांक - ०८

दिनांक - १६/०८/२०१८

सुचक : मा.राजू बनसोडे अनुमोदक : मा.विनया तापकीर

संदर्भ :- मा.राजू बनसोडे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव –

वीर भगतसिंग विद्यामंदिर अनेक समस्यांनी ग्रासली असून तेथे विद्युत, पेटिंग, पाण्याची टाकी, टॉयलेट बसविणे इ.अनुषंगिक कामे अनेक वर्षापासून करण्यात आलेली नाहीत त्यामुळे शाळेची दुरावस्था झालेली असल्याने शाळेची दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १५ विषय क्रमांक - ०९

दिनांक - १६/०८/२०१८

सुचक : मा.विनया तापकीर अनुमोदक : मा.राजू बनसोडे

संदर्भ :- मा.विनया तापकीर ,मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव –

दापोडी येथील हुतात्मा भगतसिंग विद्यामंदिर येथे १ ली ते ७ वी चे वर्ग चालविले जातात परंतू पुढील शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना खाजगी शाळांमध्ये बाहेर प्रवेश घ्यावा लागतो तरी प्रभागातील नागरिकांची आर्थिक परिस्थीती कमकुवत असून त्यांना खाजगी शाळेत प्रवेश परवडत नसल्याने ७ वी ते १० वी चे वर्ग सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १६ विषय क्रमांक - १०

दिनांक - १६/०८/२०१८

सुचक : मा.विनया तापकीर अनुमोदक : मा.राजू बनसोडे

संदर्भ :- मा.विनया तापकीर ,मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.३० दापोडी फुगेवाडी कासारवाडी येथील महानगरपालिकेच्या प्राथमिक, माध्यमिक, उर्दू शाळांमध्ये शिक्षकांची संख्याबळ कमी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असून पर्यायी शिक्षक उपलब्ध नसल्याने पालकांकडून वारंवार तक्रार येत आहे. तरी त्वरित प्रभागात योग्य शिक्षक भरती करणेस मान्यता देणेत आहेत.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १७ विषय क्रमांक – ११

दिनांक - १६/०८/२०१८

सुचक : मा.विनया तापकीर अनुमोदक : मा.राजू बनसोडे

संदर्भ :- मा.विनया तापकीर ,मा.राजू बनसोडे यांचा प्रस्ताव –

सद्याचे युग हे इंग्रजी पर्वाचे असून इंग्रजी हा रोजच्या दैनंदिन वापरात महत्वाचा आहे. तरीही महापालिकेच्या शाळांमध्ये मराठी शिक्षणाबरोबर इंग्रजी शिक्षण देणे तितकेच महत्वाचे आहे. म्हणून वीर भगतसिंग विद्यामंदिराचा पट कमी होत चालला आहे. तरी १ ली ते ७ वी सेमी इंग्रजी माध्यमिक सुरु करुन विद्यार्थ्यांना चालना द्यावी जेणेकरुन शाळेचा पट वाढविण्यास मदत होईल व खाजगी शाळांमधील न परवडनारे शिक्षण विद्यार्थ्यांना आपल्या महानगरपालिकेमार्फत मिळण्यास मदत होईल तरी १ ली ते ७ वी सेमी इंग्रजी मनपाचे शाळांमध्ये सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सोनाली दत्तात्रय गव्हाणे)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/५४२/२०१८
दिनांक : १८/०८/२०१८



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.